आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

३ जून २०२४ - सोमवार

महाराष्ट्रात विधानपरिषदेच्या द्वैवार्षिक निवडणुकीसाठी  भाजपानं तीन उमेदवारांची यादी आज जाहीर केली. कोकण पदवीधर मतदारसंघासाठी निरंजन डावखरे यांना उमेदवारी मिळाली आहे. मुंबई शिक्षक मतदारसंघातून शिवनाथ दराडे तर मुंबई पदवीधर मतदारसंघातून किरण शेलार हे उमेदवार आहेत.शिवसेनेनं कोकण शिक्षक पदवीधर मतदारसंघातून संजय मोरे यांना विधानपरिषदेसाठी उमेदवारी दिली आहे.

<><><><>

राज्यातल्या दुष्काळ निवारणासाठी सरकारनं तातडीनं पावलं उचलावीत, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे आज पत्राद्वारे केली. पाणी टंचाईमुळे बळीराजा आणि सर्वसामान्य त्रस्त झाले आहेत, जनावरांसाठी पाणी आणि चाऱ्याची कमतरताही निर्माण झाली आहे, असं पवार यांनी पत्रात म्हटलं आहे.  या समस्येकडे लक्ष वेधूनही राज्य सरकारनं कुठलीही ठोस भूमिका घेतलेली नाही, असंही त्यांनी या पत्रात नमूद केलं आहे.  राज्य सरकारनं कार्यवाही केली नाही तर जनतेच्या हितासाठी आपल्याला नक्कीच संघर्षाची भूमिका घ्यावी लागेल,  असंही त्यांनी पत्रात स्पष्ट केलं आहे.

<><><><>

भारतात लोकसभा निवडणुकीसाठी ६४ कोटी २० लाख मतदारांनी मतदानाचा हक्क बजावत जागतिक विक्रम केला आहे, असं मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी आज नवी दिल्लीत  सांगितलं. मतमोजणीच्या संदर्भात माहिती देण्यासाठी  दिल्लीत आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. अमेरिका, इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी, इटली, जपान आणि कॅनडा या जी ७ देशांच्या मतदारांपेक्षा

हा आकडा दीडपट अधिक असल्याची माहिती त्यांनी दिली. निवडणुकीची प्रक्रीया सर्व घटकांच्या सहभागाने यशस्वी झाल्याचं ते म्हणाले. मतमोजणीचे कल आणि निकाल निवडणूक आयोगाच्या संकेतस्थळावर results.eci.gov.in वर तसेच व्होटर हेल्पलाइन ॲपवर उपलब्ध असतील असं निवडणूक आयोगानं सांगितलं आहे.२३ देशांचे अभ्यासक भारतीय निवडणूका आणि प्रक्रिया पाहण्यासाठी आले होते, असंही त्यांनी सांगितलं. या पत्रकार परिषदेत निवडणूक आयुक्त सुखबिरसिंग संधु आणि ज्ञानेश कुमार हे उपस्थित होते.

<><><><><>

सार्वत्रिक लोकसभा निवडणुकीची मतमोजणी उद्या होणार आहे. महाराष्ट्रातल्या ४८ मतदार संघात सकाळी आठ वाजल्यापासून मतमोजणी सुरू होणार आहे. ही संपूर्ण प्रक्रिया सुरळीत आणि पारदर्शक पद्धतीनं होण्याच्या दृष्टीने यंत्रणा सर्व तयारीनिशी सज्ज असल्याची माहिती मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने दिली आहे.

राज्यातल्या ४८ मतदार संघात मतमोजणी केंद्रावर एकूण १४ हजार ५०७ अधिकारी-कर्मचारी नियुक्त करण्यात आले आहेत. एकूण २८९ हॉल मध्ये ४ हजार ३०९ मतमोजणी टेबलची व्यवस्था करण्यात आली आहे.
कायदा आणि सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी सर्व मतदान केंद्रावर चोख पोलीस बंदोबस्त राहील.

लोकसभा निवडणूक मतमोजणीच्या ताज्या बातम्या देण्यासाठी आकाशवाणीवरुन उद्या निवडणूक विशेष बातमीपत्र प्रसारित करण्यात येणार आहेत. तसंच निवडणूक निकालांचं सर्वंकष विश्लेषण करणारा कार्यक्रम निवाडा जनतेचा हा कार्यक्रम सकाळी ९ वाजल्यापासून सादर होणार आहे.

<><><><><>

युपीआय अर्थात युनिफाईड पेमेंट इंटरफेस व्यवहारांनी मे महिन्यात नवा उच्चांक गाठला. एनपीसीआय अर्थात नॅशनल कॉर्पोरेशन ऑफ इंडियानं ही आकडेवारी जाहीर केली आहे. ही वाढ मूल्य आणि आकारमानाच्या दृष्टीनं आतापर्यंतची सर्वाधिक वाढ असल्याचं एनसीपीआयनं म्हटलं आहे.

<><><><><>

गुजरातहून महाराष्ट्रात येणाऱ्या नायट्रोजन गॅस टँकरने अचानक पेट घेतल्याची घटना आज सकाळी धुळे जिल्ह्यात नागपूर-सुरत महामार्गवर घडली. पोलिसांनी दोन्ही बाजूची वाहतूक थांबवली आणि अग्निशमन दलानं
आग आटोक्यात आणली. या घटनेत जीवित हानी झाली नाही.

<><><><><>

वाशिम जिल्ह्यात समृद्धी महामार्गावर एक कार रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या ट्रकवर आदळून झालेल्या अपघातात कार चालकासह ३ जणांचा मृत्यू झाला.

<><><><><>

नांदेड जिल्ह्यात काल संध्याकाळी पावसानं लावलेल्या हजेरीमुळे बियाणे खरेदीसाठी शेतकऱ्यांची लगबग सुरु आहे. देगलूर शहरातल्या मोंढा बाजारात आज सकाळपासूनच शेतकऱ्यांनी खत आणि बियाणं खरेदीसाठी गर्दी केली. पेरणीसाठी घाई न करता चांगला पाऊस पडल्यावरच पेरणी करावी असं आवाहन कृषि विभागानं केलं आहे.

<><><><><>

पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर  मुंबई महानगरपालिकेने काय तयारी केली आहे अशी विचारणा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते आणि आमदार

आदित्य ठाकरे यांनी केली आहे. मुंबईतल्या २४ पैकी १५ वॉर्डांमध्ये सहाय्यक आयुक्त पूर्णवेळ नाहीत. त्याची सद्यस्थिती काय आहे? मिलन सबवेजवळच्या पावसाच्या पाण्याच्या भूमिगत टाकीची सद्यस्थिती काय आहे? १८ जानेवारी २०२३ रोजी सुरू झालेल्या मेगा घोटाळ्यात रस्त्यांच्या कामांची नेमकी सद्यस्थिती काय आहे? असे काही प्रश्न त्यांनी एक्सवरुन विचारले आहेत.

//<><><><><>//